










आदिवासी विकास विभाग
आदिवासी जनहिताय
महाराष्ट्र शासन











## महाराष्ट्र शासन

## अर्थसंकल्पः २०२२-२३

# आदिवासी विकास विभाग

**समर्थन**

**अर्थसंकल्प अध्ययन केंद्र**

१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२० ☏ ०२२-२२००३०६०
Email: samarthanmumbai97@gmail.com website: www.samarthanadvocacy.org

# समर्थन

संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **श्री. प्रविण महाजन**

उपाध्यक्ष: **श्री. आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

सचिव : **डॉ. आशिष भोसले**

संपादन :
**मुक्ता भारती / हिंदप्रभा कर्वे**

**विश्लेषण आणि संकलन:**
**रुपेश कीर -९८९२९३९६१७**

विशेष सहाय्य :
**निलम काकड, स्नेहा घरत,विलास सुवरे,**

**राजश्री कदम आणि उमेश सांगळे**

प्रसिद्धी:

**मनोज सातवी**

मांडणी व अक्षरजुळणी :
**प्रतिक्षा कोयंडे**


**नोंदणी क्रमांक:**
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी



*प्रकाशक (पत्रव्यवहार):*
१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२०
☏ ०२२-२२००३०६०
**Email:**samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org


## लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे ‘समर्थन’

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे ‘समर्थन’. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

**‘समर्थन’च्या कामाचे विविध स्तर**

- ◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.
- ◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.
- ◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.
- ◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.
- ◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.
- ◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.
- ◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.
- ◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.
- ◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# टिपण वाचण्यापूर्वी थोडेसे. . .

- 'समर्थन'ची प्रकाशने सत्तेतील तसेच विरोधातील सन्माननीय सदस्यांना उपयुक्त व्हावीत यासाठी असतात.
- सदर माहिती टिपणाचा उद्देश विधिमंडळ सभागृहांमध्ये राज्याच्या अर्थसंकल्पावर होणाऱ्या चर्चेत राज्याच्या अर्थसंकल्पातील माहिती सुलभपणे वाचता यावी आणि त्यामुळे विधिमंडळात दर्जेदार चर्चा व्हावी हा आहे.
- अर्थसंकल्प हा राज्याच्या धोरणाचा खराखुरा चेहरा असतो, प्राधान्यक्रमाचा आरसा असतो त्यामुळे अर्थसंकल्पातील तरतुदी राज्यातील दीन-दुर्बल घटकांच्या जीवनावर काय प्रभाव टाकतात यावर सभागृहात चर्चा व्हावी अशी अपेक्षा असते.
- माध्यमे जनमतावर प्रभाव टाकतात त्यामुळे धोरणकर्त्यांना त्याची दखल घ्यावी लागते. हे टिपण माध्यम प्रतिनिधींनाही संदर्भ पुस्तिका ठरावी असा प्रयत्न आहे.
- सदरची माहिती अर्थसंकल्पीय प्रकाशने, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वित्तीय अहवाल, विनियोजन लेखे, शासनाच्या विविध विभागांनी, महामंडळांनी प्रकाशित केलेले अहवाल याच माहितीवर आधारित आहे. त्यात शासना व्यतिरिक्त अन्य संस्थांची मते अगर माहिती यांचा आधार घेतलेला नाही. त्यामुळे प्रत्येक माहितीखाली त्या माहितीचा स्त्रोत दिला आहे.
- तुलनात्मक अभ्यास करता यावा म्हणून २०१४-१५ पासून २०२०-२१ पर्यंत प्रत्यक्ष खर्च आणि २०२१-२२ सुधारित अंदाज तसेच २०२२-२३चे अंतरिम अर्थसंकल्पीय अंदाज समाविष्ट केले आहेत.
- माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्यास ऋणी राहू.
- प्रकाशन अधिक माहिती पूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे.
- अर्थसंकल्पविषयक अधिक माहिती जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्यक्ष चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी समर्थन स्वीकारीत आहे.
- प्रमुख सामाजिक सेवांचे विभागवार टिपण टप्प्या-टप्प्याने प्रसिद्ध करण्यात येईल.

विश्लेषण आणि संकलन: रुपेश कीर -९८९२९३९६१७

**मार्गदर्शक-विवेक पंडित**
संस्थापक, समर्थन

## दृष्टिक्षेपात आदिवासी विकास विभाग:

### राज्याच्या अर्थसंकल्पात आदिवासी विकास विभागाचा वाटा नगण्य:

- राज्यात वर्ष २०११ च्या जनगणनेनुसार आदिवासींची लोकसंख्या १ कोटी ०५ लाख १० हजार २१३ इतकी असून वर्ष २०२२-२३ मध्ये राज्याच्या एकूण अर्थसंकल्पात आदिवासी विकास विभागाचा वाटा केवळ २.७३ टक्के इतका कमी.
- वर्ष २०१४-१५ ते २०२०-२१ या कालावधीत आदिवासी विकास विभागासाठी ६४ हजार २०१ कोटी रुपये अंदाजित करण्यात आले, मात्र प्रत्यक्ष खर्च रु. ५१ हजार ४५२ कोटी खर्च करण्यात आले. याचाच अर्थ रु. १२ हजार ७४९ कोटींच्या खर्चाला कात्री लावण्यात आली.

### आदिवासी घटक कार्यक्रम प्रत्यक्ष खर्चात होतेय मोठी घट:

- वर्ष २०२२-२३ या वर्षासाठी आदिवासी घटक कार्यक्रमासाठी रु. १४ हजार ७६१ कोटी ७६ लाखांची तरतूद करण्यात आली आहे. सन २०२१-२२ मध्ये या योजनेसाठी रु. १२ हजार ५९८ कोटी ४४ लाखांची तरतूद करण्यात आली होती. याचा अर्थ यावर्षी या योजनेच्या आकारमानात १४.६५% वाढ झाली आहे. सन २०२०-२१ मध्ये या कार्यक्रमासाठी रु. ९ हजार ४८४ कोटी ९४ लाखांचा निधी प्रस्तावित करण्यात आला होता, त्यापैकी रु. ७ हजार ४०५ कोटी १ लाखांचा निधी खर्च झाला. याचाच अर्थ या कार्यक्रमाच्या निधीतून रु. २ हजार ७९ कोटी ९३ लाख रुपयांची (२१.९२%) कपात झाली.

### आदिवासी विकास विभागांतर्गत पदांचा तपशील:

- सामान्य प्रशासन विभागाच्या आस्थापना शाखेकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार आदिवासी विकास विभागांतर्गत २० हजार ८३६ पदे मंजूर असून त्यापैकी १३ हजार ४४५ पदे भरली गेली आहेत तर ७ हजार ३९१ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांचे प्रमाण मंजूर पदांच्या तुलनेत ३५% इतके मोठे आहे.

## घरकुल:

- वर्ष २०१९-२० शबरी घरकुल योजनेअंतर्गत राज्यात एकूण ३६ हजार ७७४ घरकुलांना मंजुरी देण्यात आली, त्यापैकी २४ हजार ८७१ घरकुले बांधली, म्हणजेच ११ हजार ९०३ (३२.३७%) घरकुले बांधणे बाकी होते. त्याचप्रमाणे वर्ष २०२१-२२ मध्ये १८ हजार ५४४ घरकुले बांधण्याचे उद्दिष्ट होते, यासाठी रु. ३५० कोटींची तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी रु. १७५ कोटी खर्च झाले, आणि रु. १७५ कोटींचा (५०%) निधी अखर्चित आहे.

## कोव्हिड-१९ काळात आश्रमशाळा बंद असतानाही खर्च:

- वर्ष २०२०-२१ या वर्षी कोव्हिड -१९च्या टाळेबंदीमुळे आश्रमशाळा पूर्णपणे बंद होत्या तरी त्यावर्षी शासकीय आश्रमशाळांना रु. ८०६ कोटी ५४ लाख व अनुदानित आश्रमशाळांवर रु. १ हजार ९७ कोटी ९० लाख रुपये असे दोन्ही मिळून रु. १ हजार ९०४ कोटी ४४ लाखांचा निधी आश्रमशाळांवर खर्च करण्यात आला मात्र या काळात आश्रमशाळेतील विद्यार्थी आपआपल्या घरी होते. असे असतानाही आश्रमशाळांवर खर्च दाखविण्यात आला आहे.

## पूरक पोषण आहार योजनेअंतर्गत टी.एच.आर.(घरपोच शिजवलेला शिधा) ऐवजी कच्चे धान्यच देणे योग्य:

- आदिवासी भागातील मुलांचे तसेच मातांचे शारीरिक आरोग्य सुदृढ ठेवण्याची मोठी जबाबदारी ही एकात्मिक बाल विकास योजनेअंतर्गत अंगणवाड्याद्वारे होते. अंगणवाडीतून मिळणारा पूरक पोषण आहार, अमृत आहार, टी.एच.आर. यासारखे पोषण मूल्य दिले जातात. एप्रिल २०१९ मध्ये टी.एच.आर.च्या निकृष्ट दर्जामुळे मान.सर्वोच्च न्यायालयाने टी.एच.आर. बंद करून पर्यायी कच्चे धान्य वाटप केले जात होते. त्याचा मोठा फायदा कोव्हिड-१९ काळात झाला. परंतु पुन्हा टी.एच.आर. सुरू करण्यात आलेला आहे. मात्र त्याचा म्हणावा तसा उपयोग होत नाही. तो वाया जातो. त्यावरील खर्च वाया जातो तरी कच्चे धान्यच देणे गरजेचे आहे.

## नवसंजीवनी क्षेत्रात योजना असूनही कुपोषण बालमृत्यू मध्ये वाढ:

- राज्यात १६ आदिवासी जिल्ह्यात नवसंजीवनी योजना कार्यरत आहे, त्यात एकूण ६ हजार १४८ गावांचा समावेश आहे. त्यात बाल आरोग्य माता आरोग्य विशेत: आदिवासींचे आरोग्य सुरक्षित ठेवणे हे उद्देश असला तरी २०१७-१८ ते २०२१-२२ या ५ वर्षात आदिवासी जिल्ह्यात ८ हजार १४९ बालमृत्यू झाले आहेत.

- नवसंजीवनी योजनेअंतर्गत वर्ष २०१७-१८ ते २०२१-२२ या ५ वर्षात अंगणवाडीतील एकूण ३० लाख २२ हजार ४०० मुलांची तपासणी केली. त्यातील १ लाख ९ हजार १५२ बालके ही मध्यम तीव्र कुपोषित आढळली तर १३ हजार ५६० बालके तीव्र कुपोषित होती.

## मातृत्व अनुदान योजनेचा निधी अखर्चित-लाखो माता योजनेपासून वंचित:

- नवसंजीवनी मधून मातृत्व अनुदान योजनेचा लाभ दिला जातो, वर्ष २०१७-१८ ते २०२१-२२ या ५ वर्षांत मातृत्व अनुदानास एकूण पात्र लाभार्थी संख्या होती ४ लाख ४७ हजार ६२० त्यातील लाभ मिळालेल्या माता आहेत एकूण २ लाख ५३ हजार ५३३ म्हणजे ५६ टक्के मातांनाच हा लाभ मिळाला. तर १ लाख ९४ हजार ८७ लाभार्थी माता या योजनेपासून वंचित राहिल्या आहेत. या योजनेसाठी मागील ५ वर्षात एकूण रु. २ हजार ४९१ कोटी ३५ लाख अनुदान मंजूर होते. त्यातील रु. १ हजार ६३१ कोटी २३ लाख खर्च झाले असून ४०% निधी अखर्चित राहिला आहे.

## नवसंजीवनी योजनेअंतर्गत भरारी पथकांची सद्यस्थिती:

- वर्ष २०२०-२१ साठी २८१ भरारी पथके मंजूर होती त्यापैकी २३३ पथके कार्यरत आहेत तर ४८ पथके रिक्त आहेत. तसेच वर्ष २०२०-२१ मध्ये २८१ भरारी पथके मंजूर होती त्यापैकी २४० पथके कार्यरत असून ४१ पथके अकार्यरत आहेत.

## कुपोषण:

- The state of food security & nutrition, २०२०, या संयुक्त राष्ट्र संघाच्या (United Nation) अहवालानुसार Covid-१९ या महामारीमुळे जगातील एकूण कुपोषणाच्या प्रमाणात वाढ झाली आहे. जगातील कुपोषितांची संख्या १३ कोटी २० लाखाने वाढल्याची भीती व्यक्त केली आहे.

- मागील ८ ते १० महिन्यात जगभरात पसरलेली कोरोना महामारीमुळे रोजगारावर झालेला अनिष्ठ परिणाम, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर बेरोजगारीचा दर वाढला आहे. विकसनशील देशात बेरोजगारीचा दर सर्वात अधिक असल्याचे या अहवालात सांगण्यात आले आहे. तसेच खराब हवामान, बदललेल्या वातावरणामुळे पिकांचे झालेले नुकसान त्यामुळे अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तूच्या पुरवठ्यात झालेली घट, या सर्वांचा एकत्रित परिणाम ० ते ५ वर्षांमधील मुले, गर्भवती महिला व स्तनदा माता या कुपोषणाच्या गर्तेत ओढल्या गेल्या आहेत, असे हा अहवाल सांगतो.
- जागतिक आरोग्य संघटनेच्या (World Health Organization) अहवालानुसार आजच्या घडीला जगाची एकूण लोकसंख्या ७८० कोटी आहे. त्यापैकी ६९ कोटी लोक कुपोषित आहेत. जगाच्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेत कुपोषित लोकांचे प्रमाण ८.८५% आहे. कुपोषित मुलांचा विचार केला तर १ कोटी ४३ लाख बालके तीव्र कुपोषित तर १४ कोटी ४० लाख बालके मध्यम कुपोषित आहेत.
- महाराष्ट्र शासनाने कोरोना महामारीच्या काळात कुपोषण व बालमृत्यूशी संबंधित आकडेवारी अद्ययावत केलेली नाही. मात्र एकात्मिक बालविकास प्रकल्पाच्या (ICDS) संकेत स्थळावरून प्राप्त झालेल्या माहितीनुसार वर्ष २०१९-२० मध्ये मार्च, २०२० पर्यंत महाराष्ट्रात ११ हजार १९० अर्भक मृत्युमुखी (Infant Mortality) पडले आहेत. ३ हजार ६३ बालमृत्यू (Child Mortality) झाले आहेत. या वर्षभरात सरासरी दरमहा ५८ लाख ४९ हजार ३४१ बालके तपासण्यात आली. त्यापैकी ५ लाख ९० हजार ३१७ बालके ही, मध्यम कुपोषित (MAM) तर १ लाख ११ हजार ८१ बालके ही, तीव्र कुपोषित (SAM) आढळली आहेत. तपासलेल्या मुलांच्या तुलनेत कुपोषणाचे हे प्रमाण १२% आहे.
- महाराष्ट्रातील आदिवासीबहुल १६ जिल्ह्यांचा विचार केला तर या जिल्ह्यांत वर्ष २०१९-२० मध्ये २ हजार २२ अर्भक मृत्यू तर ७०६ बालमृत्यू झाले आहेत. वर्षभरात सरासरी दरमहा १ लाख ४४ हजार ८४५ मध्यम कुपोषित (MAM) तर ३७ हजार १४८ तीव्र कुपोषित (SAM) बालके आढळली आहेत. तपासलेल्या मुलांच्या तुलनेत कुपोषणाचे प्रमाण २१.३०% आहे.
- पालघर जिल्ह्याचा विचार केला तर वर्ष २०१९-२० मध्ये पालघर जिल्ह्याची स्थिती इतर आदिवासी जिल्ह्यांच्या मानाने कुपोषणाबाबत गंभीर राहिली आहे. या कालावधीत २६३

अर्भक मृत्यू तर ११४ बालमृत्यू झाले आहेत. यावर्षात सरासरी दरमहा ३४ हजार २०३ मध्यम कुपोषित (MAM) बालके तर ६ हजार ७५२ तीव्र कुपोषित (SAM) बालके आढळून आलीत.तपासलेल्या मुलांच्या तुलनेत कुपोषणाचे हे प्रमाण २४.०७% आहे.

- पालघर जिल्ह्यामध्ये जव्हार तालुक्याची कुपोषणाची स्थिती इतर तालुक्याच्या मानाने सर्वात गंभीर आहे. वर्ष २०१९-२० मध्ये एकट्या जव्हार तालुक्यात पालघर जिल्ह्यातील मृत्यूंपैकी ५८(२२.०५%) अर्भक मृत्यू झाले आहेत तर २०(१७.५४%) बालमृत्यू झाले आहेत. या वर्षात सरासरी दरमहा १३ हजार ४ मुले तपासली गेली. त्यापैकी ४ हजार ५१४ मध्यम कुपोषित (MAM) तर १ हजार ३४४ तीव्र कुपोषित (SAM) बालके आढळून आले आहेत. तपासलेल्या मुलांच्या तुलनेत कुपोषणाचे हे प्रमाण ४५.०५% आहे.
- वर्ष २०१९-२० मध्ये महाराष्ट्राच्या तुलनेत आदिवासीबहुल १६ जिल्ह्यात कुपोषणाचे प्रमाण ९.३०% अधिक आहे. तर पालघर जिल्ह्याची स्थिती त्याहीपेक्षा गंभीर असून महाराष्ट्राच्या तुलनेत १२.०७% अधिक आहे. तर आदिवासीबहुल जिल्ह्यांच्या तुलनेत २.७७% अधिक आहे.
- कोरोना काळात महिला व बाल विकास विभागांतर्गत एकात्मिक बालविकास प्रकल्प (I.C.D.S.) कार्यालयाने एप्रिल, २०२० पासूनची आकडेवारी अद्ययावत केलेली नाही. कोरोना काळात शिक्षण, कोरोना महामारी रोखण्यासाठी सुरू असलेले प्रयत्न वगळता गरीब वंचित समाजाला अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा, बालकांसाठी असलेल्या पोषण आहाराच्या योजना याकडे शासनाचे दुर्लक्ष झाले आहे.
- महाराष्ट्रात एकात्मिक बाल विकास प्रकल्प (I.C.D.S.) व राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-४ (N.F.H.S.-४) जुलै, २०२० मध्ये पालघर, रायगड, नंदुरबार व पुणे या जिल्ह्यात संयुक्तरित्या केलेल्या सर्वेक्षणात असे आढळून आले की, कोरोना काळात राज्य शासनाच्या पोषण आहार योजनांवर अनिष्ट परिणाम झाला असून त्यामुळे अन्न लाभार्थ्यांपर्यंत न पोहोचता ते वाया जाणे. पोषण आहाराचा कमी पुरवठा होणे, एपीजे अब्दुल कलाम अमृत आहार योजना आदिवासी मुले व गर्भवती, स्तनदा मातांना मोफत जेवण उपलब्ध करून देते. परंतु मार्चपासून अंगणवाडी बंद झाल्यामुळे ताजे शिजलेले जेवण शक्य नसल्याने राज्याने स्थानिक पातळीवर

खरेदी केलेले रेशन मुलांना पुरवण्यास परवानगी दिली होती. यामध्ये असे आढळून आले की, नंदुरबारमध्ये रेशन पुरविण्याचे कंत्राट पुण्यातील ज्या एजन्सीला देण्यात आले होते, त्या एजन्सीने धडगाव आणि अक्कलकुवा सारख्या दुर्गम भागात, जवळपास दोन महिन्यांनंतर 'मे' महिन्यात रेशन पोहोचवले.

- अधिकारी वर्गाची मानसिकता, दूरदृष्टीचा अभाव प्रशासनाची दप्तर दिरंगाई, अनियमितता व गैरव्यवहार या सर्वांमुळे कुपोषण निर्मूलनासाठी सुरू असलेल्या लढ्याला सातत्याने अपयश येत आहे हे वरील उदाहरणावरून दिसून येते.

## आदिवासी आश्रमशाळा विद्यार्थी संख्या वाढली परंतु खर्च घटला:

- राज्यातील शासकीय आश्रमशाळा एकूण ५०० त्यातील वर्ष २०१९-२० मधील विद्यार्थी संख्या होती १ लाख ८४ हजार ५४६ व झालेला खर्च आहे रु. १ हजार १९९ कोटी ३५ लाख. वर्ष २०२०-२१ मधील विद्यार्थी संख्या होती १ लाख ९१ हजार ७१३ व त्यावर झालेला खर्च होता ८०६ कोटी ५४ लाख. इथे लक्षात येते कि, २०१९-२० च्या तुलनेत २०२०-२१मध्ये ८ हजार १६७ विद्यार्थी वाढलेले आहेत तरी सदर आर्थिक वर्षात झालेल्या खर्चामध्ये २०१-२०च्या तुलनेत ३९२ कोटी ८१लाख एवढी तफावत आढळून येते. तर वर्ष २०२१-२२ मध्ये ४९७ आश्रमशाळांमध्ये १ लाख ९० हजार ६०८ विद्यार्थी आहेत व त्यावर डिसेंबर २१ पर्यंत झालेला खर्च आहे रु. ६३१ कोटी २ लाख.

- तर राज्यातील एकूण अनुदानित आश्रमशाळा आहेत ५५६, वर्ष २०१९-२०मध्ये २ लाख ३३ हजार ४८५ विद्यार्थी होते. त्यावर रु. १ हजार ८८ कोटी ७८लाख निधी खर्च झाला तर वर्ष २०२०-२१ मध्ये २ लाख ४१ हजार ४६८ विद्यार्थ्यांसाठी रु. १ हजार ९७ कोटी ९० लाख निधी खर्च झालेला दिसतो तर आर्थिक वर्ष २०२१-२२ डिसेंबरपर्यंत २ लाख ४२ हजार ९१६ विद्यार्थ्यांवर रु. ८२६ कोटी ११ लाख निधी खर्च झाला आहे. राज्यातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळांच्या विद्यार्थी संख्या व त्यावरील झालेला खर्च पाहिल्या शासकीय आश्रमशाळेच्या तुलनेत अनुदानित आश्रमशाळांमधील झालेल्या खर्चाचे प्रमाण समतोल आहे.


*(स्त्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०२१-२२, आरोग्य संचालनालयाचा अहवाल भाग-२, वित्त विषयक विवरणपत्र २०२२-२, महात्मा गांधी रोजगार हमी योजना संकेतस्थळ, संयुक्त राष्ट्र संघाचा अहवाल, युनीसेफचा अहवाल, ग्लिबल हंगर इंडेक्स, २०२१)*

# आदिवासी विकास विभाग

## ७ वर्षात १२ हजार ७४९ कोटींच्या खर्चाला कात्री!

## विभागाचा मागील ७ वर्षात सरासरी वार्षिक खर्च केवळ ७ हजार ३५० कोटी रुपये!

आलेख क्र.१ (रु. कोटीत)




| | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | ६५०३ | ७७९२ | ७६४३ | ८८१७ | ११२२१ | १०६६७ | ११५५८ | १२७७९ | १४९५० |
| सुधारित अंदाज | ६९८४ | ७५९५ | ७७०० | ९१६१ | १०७५७ | ९६७२ | १०९६६ | १२७८३ | |
| प्रत्यक्ष खर्च | ५८२८ | ६२५९ | ६६५३ | ७४७८ | ८६१६ | ७९०० | ८७१८ | | |

*(स्रोत: अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका व वित्तविषयक विवरणपत्र)* *(टीप: वर्ष २०२१-२२ चे सुधारित अंदाज व वर्ष २०२२-२३ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- **राज्यात वर्ष २०११ च्या जनगणनेनुसार आदिवासींची लोकसंख्या १ कोटी ०५ लाख १० हजार २१३ इतकी असून वर्ष २०२२-२३ मध्ये राज्याच्या एकूण अर्थसंकल्पात विभागाचा वाटा केवळ २.७३ टक्के इतका आहे.**
- **वर्ष २०१४-१५ ते २०२०-२१ या कालावधीत आदिवासी विकास विभागासाठी रु. ६४ हजार २०१ कोटी अंदाजित करण्यात आले, मात्र प्रत्यक्ष खर्च रु. ५१ हजार ४५२ कोटी खर्च करण्यात आले. याचाच अर्थ रु.१२ हजार ७४९ कोटींच्या खर्चाला कात्री लावण्यात आली.**
- **वर्ष २०२०-२१ मध्ये विभागाने सुधारित अंदाज रु.१० हजार ९६६ कोटी इतका होता. मात्र प्रत्यक्षात रु. ८ हजार ७१८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून रु. २ हजार २४८ कोटींची कपात झाली.**
- **आदिवासी क्षेत्रातील बेरोजगारी, कुपोषण व दारिद्र्य वाढण्यामागे शासनाची उदासीनता दिसून येते. सातत्याने अर्थसंकल्पीत रकमेपेक्षा कमी निधी उपलब्ध होत असल्याने दिसते.**

# मागील ७ वर्षात आदिवासी उपयोजनेचा अनुशेष
# ७ हजार १८४ कोटी रुपये !

**वर्ष २०१८-१९ ते २०२०-२१ या तीन वर्षातील अनुशेष ४ हजार ८३१ कोटी इतका मोठा**

तक्ता क्र. १ (रु.कोटीत)

| वर्ष | वार्षिक राज्य योजना नियतव्यय | आदिवासी उपयोजनेसाठी तरतूद | वित्त विभागाकडून प्राप्त निधी | प्रत्यक्ष खर्च | प्रत्यक्ष खर्च (%) | अनुशेष (३-५) |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१४-१५ | ५१,२२२ | ४,८१४ | ४,८१४ | ४,०९० | ७.९८ | ७२४ |
| २०१५-१६ | ५४,९९९ | ५,१७० | ४,८४१ | ४,५६२ | ८.२९ | ६०८ |
| २०१६-१७ | ५६,९९७ | ५,३५७ | ५,०७५ | ४,९५७ | ८.७० | ४०० |
| २०१७-१८ | ७७,१८४ | ६,७८३ | ६,४०६ | ६,१६२ | ७.९८ | ६२१ |
| २०१८-१९ | ९५,००० | ८,९६९ | ७,५८७ | ७,२७४ | ७.६६ | १,६९५ |
| २०१९-२० | ९९,००० | ८,५३१ | ७,६११ | ६,८३३ | ६.९० | १,६९८ |
| २०२०-२१ | १,००,८०० | ८,८५३ | ७,६३७ | ७,४१५ | ७.३६ | १,४३८ |
| एकूण | ५,३५,२०२ | ४८,४७७ | ४३,९७१ | ४१,२९३ | ७.७२ | ७,१८४ |

*(स्त्रोत: आदिवासी उपयोजना प्राप्त नियतव्यय, माहिती अधीकारात प्राप्त माहिती, मार्च, २०२१)*

- **वर्ष २०१४-१५ ते २०२०-२१ या ७ वर्षांच्या कालावधीत आदिवासी बांधव हक्काच्या रु. ७ हजार १८४ कोटींच्या निधीपासून वंचित राहिला आहे.**
- **वर्ष २०१८-१९ ते २०२०-२१ या तीन वर्षातील अनुशेष रु. ४ हजार ८३१ कोटी इतका मोठा.**

**वर्ष १९९४-९५ पासून राज्यात आदिवासी उपयोजना कार्यान्वित करण्यात आली. सन २०१४-१५ पासून वर्ष २०२०-२१ पर्यंत शासनाने आदिवासींना त्यांच्या हक्काच्या रु.७ हजार १८४ कोटी पासून वंचित ठेवण्यात आलेले आहे. राघोजी भांगरा, नाग्या कातकरी या आदिवासी स्वातंत्र्यसेनानी स्वातंत्र्य लढ्यात स्वत:ला झोकून दिले. मात्र हाच आदिवासी समाज आज स्वातंत्र्याच्या ७० वर्षांनंतरही शिक्षण, आरोग्य, मूलभूत सोयींपासून वंचित आहे. आदिवासींच्या वाट्याचे रु. ७ हजार १८४ कोटी इतका निधी मागील ७वर्षापासून त्यांच्या विकासासाठी वापरला न जाण्याला आजवरचे सारे राज्यकर्ते दोषी आहेत का? हा आदिवासींच्या विकास निधीचा अपहार नाही का?**


सुकथनकर समितीने अशी शिफारस केली आहे की आदिवासी उपयोजनेच्या नियतव्ययाचा मोठा भाग आदिवासींना प्रत्यक्ष लाभ देणाऱ्या स्थानिक योजनांसाठी दिला पाहिजे. उदा. लहान पाटबंधाऱ्याच्या योजना, मृद आणि जलसंधारण, ग्रामीण पाणी पुरवठा, जोड रस्ते, माता व बाल आरोग्य इत्यादी योजनांना प्राधान्याने निधी उपलब्ध करून गरजेचे असताना देखील जिल्ह्यांसाठी पुरेसा नियतव्यय खर्च करण्यात येत नाही.

# आदिवासीबहुल व बिगर आदिवासी जिल्ह्यात वाढतेय विषमतेची प्रचंड दरी

## राज्याच्या सरासरीपेक्षा आदिवासींचे दरडोई उत्पन्न ७५ हजार ५०० रुपयाने कमी

राज्याचे आर्थिक सर्वेक्षण स्पष्टपणे राज्याची सरासरी व आदिवासीबहुल जिल्हे या दरम्यानच्या दरडोई उत्पन्नातील असमर्थता दर्शविते. जर आपण गडचिरोली (रु. ९४ हजार २१४) आणि नंदुरबार (रु. ९५ हजार ५३२) व वाशिम (रु. ९६ हजार ५२०) यासारख्या आदिवासींचे प्राबल्य असणाऱ्या जिल्ह्यांच्या दरडोई उत्पन्नाची तुलना केली तर आपणास असे दिसून येते की, पुणे (रु.२ लाख ५६ हजार ९३६), ठाणे (रु.२ लाख ६८ हजार २९३) व मुंबईचे (रु. ३ लाख १३ हजार ८५२) आहे. तर राज्याचे दरडोई उत्पन्न हे (रु.१ लाख ६५ हजार, ४९१) इतके आहे. शहरी भागाचे दरडोई उत्पन्न हे नंदुरबार व गडचिरोलीच्या दरडोई उत्पन्नाच्या जवळपास तिप्पट आहे. मुंबई-ठाणे-पुणे व गडचिरोली-नंदुरबार यांच्या दरडोई उत्पन्नातील तफावत साधारणत: रु. १ लाख ८१ हजार ३०४ इतके भरते. तर राज्याच्या सरासरीची तफावत साधारणत: रु. ७५ हजार ५०० इतकी भरते.

आलेख क्र.२




*(स्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी वर्ष २०२१-२२)*

- **सर्वात कमी दरडोई उत्पन्न असलेले तीन जिल्हे गडचिरोली (रु. ९४ हजार २१४), नंदुरबार (रु. ९५ हजार ५३२), वाशिम (रु. ९६ हजार ५२०), असून पुणे (रु.२ लाख ५६ हजार ९३६), ठाणे (रु.२ लाख ६८ हजार २९३) व मुंबईचे दरडोई उत्पन्न सर्वाधिक (रु. ३ लाख १३ हजार ८५२) इतके आहे.**
- **मुंबई, ठाणे व पुणे येथील महानगरांचे दरडोई उत्पन्न आणि आदिवासी जिल्ह्यांचे उत्पन्न हे विषमतेची प्रचंड दरी निर्माण करते.**

# राज्यात मागील १४ वर्षात ४९ हजार ७०० बालमृत्यू

राज्यातील विशेषत: आदिवासी भागातील अर्भक मृत्यू आणि माता मृत्यू कमी करण्यासाठी आदिवासी उपयोजना क्षेत्रात कार्यान्वित असलेल्या विविध योजनांच्या अंमलबजावणीमध्ये एकसूत्रता व प्रभावीपणा आणण्याच्या दृष्टीने सर्व घटक कार्यक्रमांना एकत्र करून शासनाने नवसंजीवनी योजना सुरू केली आहे.

*तक्ता क्र. २* **नवसंजीवनी योजनांतर्गत बालमृत्यूची माहिती**

| वर्ष | ० ते १ वयोगट | १ ते ६ वयोगट | एकूण |
|---|---|---|---|
| २००८-०९ | ४,५२५ | १,५६१ | ६,०८६ |
| २००९-१० | ४,४४३ | १,८३७ | ६,२८० |
| २०१०-११ | ४,१२० | १,७२५ | ५,८४५ |
| २०११-१२ | ३,५६४ | १,३५० | ४,९१४ |
| २०१२-१३ | ३,५०७ | १,०७४ | ४,५८१ |
| २०१३-१४ | २,९६५ | ९९७ | ३,९६२ |
| २०१४-१५ | ३,०२२ | १,१६४ | ४,१८६ |
| २०१५-१६ | १,९१७ | ७६२ | २,६७९ |
| २०१६-१७ | २,०७० | ७४८ | २,८१८ |
| २०१७-१८ | १,६५८ | ५०३ | २,१६१ |
| २०१८-१९ | १,५८८ | ४१८ | २,००६ |
| २०१९-२० | १,३०४ | ४११ | १,७१५ |
| २०२०-२१ | १,१९५ | ३५८ | १,५५३ |
| २०२१-२२ | ६७२ | २४२ | ९१४ |
| **एकूण** | **३६५५०** | **१३१५०** | **४९७००** |

*(**स्रोत**: आरोग्य संचालनालयाचा फेब्रुवारी २०२२ अखेरचा अहवाल) (**टीप**: वर्ष २०२१-२२ चे आकडेवारी, नोव्हेंबर, २०२१ पर्यंत)*

- **राज्यात बालमृत्यूचे प्रमाण कमी असल्याची पोकळ वल्गना करणाऱ्या प्रगत महाराष्ट्रात वर्ष २००८-०९ ते २०२१-२२ या १४ वर्षात ४९ हजार ७०० बालकांचा मृत्यू.**
- **० ते १ वयोगटातील बालमृत्यूचे प्रमाण प्रतिवर्षी सरासरी ४ हजार ३०० इतके असून १ ते ६ वयोगटातील बालमृत्यूचे सरासरी प्रमाण १ हजार ६७९ इतके आहे.**
- **वर्ष २००८-०९ ते २०२१-२२मध्ये ० ते १ वयोगटातील ३६ हजार ५५० बालमृत्यूंची नोंद झाली.**
- **वर्ष २००८-०९ ते २०२१-२२ मध्ये १ ते ६ वयोगटातील १३ हजार १५०बालमृत्यूंची नोंद झाली.**

# नवसंजीवनी जिल्ह्यातील कुपोषित बालकांची संख्या
# वर्ष २०२१-२२ मध्ये २६ हजार ७०० इतकी मोठी

तक्ता क्र. ३

| जिल्हा | २०१९-२० | | | २०२०-२१ | | | २०२१-२२(ऑक्टो २१अखेर) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मध्यम तीव्र कुपोषित | अति तीव्र कुपोषित | एकूण | मध्यम तीव्र कुपोषित | अति तीव्र कुपोषित | एकूण | मध्यम तीव्र कुपोषित | अति तीव्र कुपोषित | एकूण |
| ठाणे | १२८४ | २६८ | १५५२ | १११४ | ११६ | १२३० | ८५० | १२४ | ९७४ |
| पालघर | १६११ | १७४ | १७८५ | १०३२ | ११० | ११४२ | १४०३ | १५० | १५५३ |
| रायगड | ६९ | ११ | ८० | ३२ | १० | ४२ | १२९ | २८ | १५७ |
| पुणे | ७६ | १६ | ९२ | ४३ | १२ | ५५ | ३६ | ५ | ४१ |
| नाशिक | ११४४ | ४८९ | १६३३ | १५०७ | २७६ | १७८३ | १२०४ | २२१ | १४२५ |
| अहमदनगर | २७१ | ६३ | ३३४ | ५११ | १२१ | ६३२ | ७४ | १५ | ८९ |
| धुळे | २०१ | २२ | २२३ | ८७१ | ३२८ | ११९९ | ७२५ | ३२२ | १०४७ |
| जळगाव | २९ | ८ | ३७ | ५६ | १८ | ७४ | ३२७ | १३१ | ४५८ |
| नंदूरबार | ९६४५ | १९७२ | ११६१७ | ९८१४ | १२६१ | ११०३० | १४३९५ | २१४५ | १६५४० |
| अमरावती | ११२७ | १०० | १२२७ | १०७७ | ८४ | ११६१ | १९२६ | १७८ | २१०४ |
| यवतमाळ | १७ | ४ | २१ | १९ | ३ | २२ | १६ | २ | १८ |
| नांदेड | ४ | २ | ६ | १६ | ११ | २७ | ४४ | १० | ५४ |
| गोंदिया | १७५ | ३४ | १०९ | १८४ | ४२ | २२६ | ६१५ | १३५ | ७५० |
| गडचिरोली | २७९ | ८५ | ३६४ | ५९६ | १०६ | ७०२ | ६५६ | १८९ | ८४५ |
| नागपूर | ३७ | १२ | ४९ | २८ | ८ | ३६ | ४७ | ८ | ५५ |
| चंद्रपूर | २१० | ७५ | २८५ | १२३ | ३४ | १५७ | ५४२ | ११८ | ६६० |
| **एकूण** | **१६१७९** | **३३३५** | **१९४१४** | **१७०२३** | **२५४०** | **१९५१८** | **२२९८९** | **३७८१** | **२६७७०** |

*स्रोत: आरोग्य सेवा संचालनालयाचा अहवाल फेब्रुवारी २०२२*

- **राज्यातील आदिवासी भागात वर्ष २०२१-२२ मध्ये (ऑक्टोबर, २०२१ अखेर पर्यंत) २६ हजार ७७० कुपोषित बालकांची नोंद झाली असून त्यातील ३ हजार ७८१ अति तीव्र कुपोषित तर २२ हजार ९८९ बालके ही मध्यम तीव्र कुपोषित अशी आढळलेली आहेत.**

- **राज्यातील आदिवासी भागात वर्ष २०२०-२१ मध्ये १९ हजार ५१८ कुपोषित बालकांची नोंद झाली असून त्यातील २ हजार ५४० अति तीव्र कुपोषित तर १७ हजार ०२३ बालके ही मध्यम तीव्र कुपोषित अशी आढळलेली आहेत.**

# प्रगत महाराष्ट्रातील आदिवासी देशातील आदिवासींपेक्षा दुर्दैवी

### भारतातील व महाराष्ट्रातील कुपोषित प्रौढ पुरुष व स्त्रिया यांचे प्रमाण

तक्ता क्र. ४ (टक्केवारी)

| प्रवर्ग | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|
| **भारत- आदिवासी** | ४० | ४९ |
| **महाराष्ट्र आदिवासी** | ५२.६ | ६२.५ |

*(स्त्रोत: नियोजन आयोग, २०११)*

**देशातील शंभरात ४० आदिवासी अर्धपोटी व कुपोषित तर प्रगत महाराष्ट्रात ५२ आदिवासी अर्धपोटी व कुपोषित राज्यातील आदिवासींची एवढी दारुण परिस्थिती असताना आमची मान ताठ कशी राहू शकते. जर पोषण आहार हा मानवी विकासाचा निर्देशांक म्हणून विचारात घेतला तर, महाराष्ट्रातील आदिवासी लोक हे देशातील सरासरी आदिवासी लोकांपेक्षा अधिकच वंचित आहेत. भारतीय मानव विकास अहवालामध्ये असे प्रतिपादन केले आहे की, महाराष्ट्रातील आदिवासी लोकांची परिस्थिती, देशातील सरासरीपेक्षा अत्यंत दयनीय अशी आहे.**

# खावटी योजनेच्या लाभापासून आजही ९७ हजारांपेक्षा अधिक आदिवासी कुटुंब वंचित

**खावटी योजना आदिवासी विकास विभागाने बंद केली होती. त्यानंतर कोरोना काळात स्थलांतरित होणाऱ्या आदिवासींचा रोजगार बुडाल्यानंतर आदिवासींवर उपासमारीची वेळ आली. आदिवासींसाठी काम करणाऱ्या संस्था-संघटनांनी शासनावरचा दबाव वाढवला. श्रमजीवी संघटनेने पालघर, ठाणे, नाशिक व रायगड जिल्ह्यात आंदोलने केली. त्यानंतर आदिवासी विकास विभागावर दबाव वाढला त्यामुळे वर्ष २०१४-१५ पासून मागील ७ वर्षे बंद असलेली खावटी योजना पुन्हा सुरू करणे भाग पडले.**

- शासनाने ११ लाख ५५ हजार अनुसूचित जमातीच्या कुटुंबांना खावटी योजनेचा लाभ देण्याचे जाहीर केले होते. मात्र दिनांक १७ डिसेंबर २०२१ रोजी पर्यंत जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार अजूनही ११ हजार ४१८ कुटुंबांचे अर्ज प्राप्त झालेले नाहीत. तर, DEO स्तरावर ५२ हजार ६९१ लाभार्थी कुटुंब खावटीचा लाभ मिळवण्यासाठी प्रतिक्षेत आहेत. तर, ८ हजार २४२ कुटुंबे छाननी मध्ये अपात्र ठरले आहेत. आतापर्यंत एकूण १० लाख ५७ हजार ३५६ लाभार्थी कुटुंबांना लाभ मिळाला आहे. तर ९७ हजार ६४४ कुटुंब योजनेपासून वंचित आहेत.

- जाहिरात व प्रसिद्धी करणे, प्रशासकीय खर्च व इतर खर्च असा मिळून तब्बल रु. २४ कोटी (५ टक्के) चा अतिरिक्तक्त खर्चाचे प्रावधान केले आहे. या रु. २४ कोटी मध्ये अतिरिक्त ६० हजार कुटुंबांना योजनेचा लाभ मिळू शकला असता.

- आदिवासी कुटुंब खावटी योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र ठरावीत यासाठी जातीचे दाखले आणि आधार कार्ड देण्यासाठी अपेक्षित असे विशेष कॅम्प लावून लाभार्थ्यांना जातीचे दाखला किंवा आधार कार्ड उपलब्ध करून देणे गरजेचे होते मात्र शासन ते करण्यात अपुरे पडत आहे. त्यामुळे आजही अनेक पात्र लाभार्थी जातीचे ताखले, आधार कार्ड, बँक खाते उपलब्ध नसल्यामुळे खावटी योजनेपासून वंचित आहेत. ही अतिशय गंभीर व खेदाची बाब आहे.

- योजनेत अनियमितता होऊ नये म्हणून सुकाणू समिती नेमण्यात आली. सुकाणू समितीच्या निर्णयानंतर वस्तू खरेदी थांबवून डीबीटी स्वरुपात मदत देण्याचे ठरले तसे आदेश मान. मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत मात्र त्यांनाही केराची टोपली दाखवली गेली.